# बराक ओबामा
# यस वी कॅन!

मेधा ना. मराठे

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**बराक ओबामा– यस वी कॅन!**
मेधा ना. मराठे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८–ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर– ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
मेधा ना. मराठे
३ रा रस्ता, भाग्यनगर,
'सुखकर्ता' अपार्टमेंटजवळ,
बेळगाव– ५९० ००६ (कर्नाटक)
मो. नं. ९४४९७०२१६१

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २३०/-

# बराक ओबामा
# यस वी कॅन!

# प्रस्तावना

प्रचंड ऊर्जा आणि उत्कृष्ट वक्ता असलेल्या बराक ओबामांनी अमेरिकन लोकांना समजावलं की, आता काळ बदलला आहे. सगळंच बदललं आहे... अमेरिकनांना एका मुक्तिदात्याची गरज आहे. एका 'गोऱ्या नसलेल्या' माणसाला व्हाईट हाऊसचा मार्ग मोकळा करून द्यावा लागेल. बराक ओबामा हे अमेरिकनांचे 'हिरो' ठरले. सगळ्या जाती, धर्म आणि वंशाच्या लोकांनी त्यांना स्वीकारलं. ते जगातील सर्वांत जुन्या सामर्थ्यशाली लोकशाही राष्ट्राचे कॅप्टन झाले.

आपल्या देशाला आर्थिक महामंदीतून बाहेर काढायचं आहे; अमेरिका हा उदार दृष्टिकोन असलेला देश आहे, ही त्याची प्रतिमा निर्माण करायची आहे; हा विश्वास मनात ठेवून ओबामा जगातील सर्वांत शक्तिवान खुर्चीत बसले. त्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष केवळ एखाद्या राजकारणी माणसालाच नव्हे, तर सर्वसामान्यालासुद्धा प्रेरणादायी ठरेल.

१९३० मध्ये आलेल्या महामंदीनंतर रुजवेल्ट हे अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले होते. त्यांनी अमेरिकेला आर्थिक संकटातून बाहेर काढलंही होतं. ते यश मिळविण्यासाठी त्यांना अमेरिकेतील सुप्रीम कोर्टात लढा द्यावा लागला. तरी ते विकासाच्या मार्गावरून ढळले नाहीत.

२००८ मध्ये अमेरिकेत जबरदस्त आर्थिक मंदी आली. अर्थव्यवस्था, राजकारण आणि कपटनीती यामुळे प्रेसिडेंट जॉर्ज बुश अत्यंत अयशस्वी ठरले. नेमक्या याच कारणांमुळे ओबामांचा व्हाईट हाऊसकडे जाण्याचा मार्ग सुकर झाला. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार जॉन मॅक्केन यांना निवडून देणं म्हणजे जॉर्ज बुश यांना तिसऱ्यांदा निवडून दिल्यासारखं ठरलं असतं. ओबामा अमेरिकेचे पहिले अश्वेत अध्यक्ष झाले. ही घटना जगाच्या आणि अमेरिकेच्या इतिहासात निश्चितच महत्त्वाची घटना म्हणून लिहिली जाईल. कारण बराक ओबामांचा विजय म्हणजे

डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांचं स्वप्न सत्यात उतरणं. हे घडण्यासाठी पुष्कळ काळ जावा लागला. १७८९ मध्ये जॉर्ज वॉशिंग्टन अमेरिकेचे पहिले अध्यक्ष झाले. एका 'काळ्या' माणसाला व्हाईट हाऊसपर्यंत पोहोचायला २२० वर्षे लागली. १९६३ मध्ये डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांनी वॉशिंग्टनच्या लाखो लोकांना समानतेचे तत्त्व समोर ठेवून प्रश्न विचारला होता. त्या ऐतिहासिक भाषणाच्या वेळी ओबामा दोन वर्षांचे होते.

निवडणूक लढविताना मात्र ओबामांनी आपण मागास, दलित, कृष्णवर्णीयांचे तारणहार आहोत, असं प्रचाराचं भांडवल केलं नव्हतं. तसं केलं असतं, तर त्यांच्यासाठी जिंकणं कठीण होतं. अर्थात विरोधकांनी त्यांचा वंश, कुळ, पूर्वज यावरून कुत्सित प्रचार केला. त्यात गोऱ्या अमेरिकनांची संकुचित वृत्ती जगाला दिसली. ओबामांनी मात्र संपूर्ण परिवर्तन- 'चेंज'- या जादूई मंत्रानं अमेरिकी जनतेला विशेषत: तरुण व महिलांना मोहिनी घातली. या नेत्याला परिवर्तन- 'चेंज' हवा आहे आणि तो घडविण्याची त्याच्याकडे क्षमता आहे असाच कौल जनतेनं दिला. ओबामांनी 'युनायटेड' असण्याची स्वप्नं पाहिली आणि ती पूर्ण व्हावीत यासाठी हा कौल आहे.

या शतकातील आर्थिक त्सुनामीतून सर्वसाधारण अमेरिकन माणसाला सोडविणं, पूर्वाध्यक्ष बुश यांच्या अदूरदर्शी आणि अकुशल निर्णयांमुळे बिघडलेली परिस्थिती पुन्हा पूर्वपदावर आणणं आणि दशहतवादाशी लढणं या आघाड्यांवर लढणं प्रेसिडेंट ओबामांकडून अपेक्षित होतं आणि ते त्याच संकटांना तोंड देत आहेत. अमेरिकेची अनुदार ही प्रतिमा ते बदलू पाहात आहेत. ओबामा अमेरिकेचे प्रेसिडेंट झाले असले, तरी श्वेत-अश्वेत यांच्यातील वंशभेदाची दरी मिटली असे नाही. श्वेत-अश्वेत याचप्रमाणे हिंदू, ख्रिश्चन, मुस्लीम सगळ्या वंशांना एकत्रित आणून संतुलित आणि सगळ्या मानवजातीचे नेतृत्व हीच त्यांच्या कार्याची दिशा आहे. त्यांच्या नावात 'हुसेन' असल्याने अनेकांना त्यांच्याविषयी शंका-कुशंका होत्या. त्यांना अध्यक्ष म्हणून मिळालेला विजय हा सर्व धर्म, वंशाच्या समाजांनी त्यांच्यावर दाखविलेल्या विश्वासाचा विजय होय.

बराक ओबामा २०१२ मध्ये अमेरिकेचे प्रेसिडेंट म्हणून दुसऱ्यांदा निवडून आले. आता २०१६ मध्ये पुन्हा अध्यक्षपदाची निवडणूक होईल. त्यावेळी

डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार हिलरी क्लिंटन या आहेत. ओबामांची कारकीर्द अमेरिकेच्या आणि जगाच्या दृष्टीने किती यशस्वी ठरली आहे, याची उत्तरं राजनीतीज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ वेगवेगळ्या प्रकारे देतील; परंतु प्रतिकूल वंश-परिस्थिती असतानाही प्रचंड संघर्ष करत ओबामा विश्वातील शक्तिशाली पदापर्यंत पोहोचले आहेत. त्यांची ही संघर्षयात्रा प्रत्येकाला नक्कीच प्रेरणादायी ठरेल. 'यस् वीइ कॅन' हा उमेद देणारा मंत्र सगळ्यांनीच मनाशी जपावा. 'बदल' नक्कीच घडून येईल.

✦✦✦

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | यशाची चढती कमान | ११ |
| २. | 'ड्रीम्स'... आत्मकथन | १६ |
| ३. | जगावेगळी आई-ॲन | २० |
| ४. | बराक हुसेन ओबामा (सिनिअर) | २३ |
| ५. | इंडोनेशिया | २७ |
| ६. | पूनाहो स्कूल, हवाई | ३३ |
| ७. | शोध स्वत:चा | ३७ |
| ८. | न्यूयॉर्क... न्यूयॉर्क | ४१ |
| ९. | बॅरीचा बराक झाला | ४५ |
| १०. | वाट सापडली | ४८ |
| ११. | डॉ. मार्टिन ल्यूथर किंग | ५० |
| १२. | महात्मा गांधी | ५५ |
| १३. | अब्राहम लिंकन (१८०९-१८६५) | ६१ |
| १४. | नेल्सन मंडेला | ६८ |
| १५. | शिकागो | ७७ |
| १६. | पहिली केनिया भेट | ८३ |
| १७. | हार्वर्ड लॉ स्कूल | ८५ |
| १८. | शिकागोला परत | ८८ |
| १९. | राजकारणात प्रवेश | ९३ |
| २०. | इलिनॉइस राज्याची ओळख | ९८ |
| २१. | लेजिस्लेटर | १०१ |

२२. राजकीय महत्त्वाकांक्षा ..................................... १०४
२३. पराभवाची चिकित्सा ..................................... १०८
२४. बदल ..................................................... ११०
२५. सिनेटर बराक ओबामा ..................................... १२१
२६. निश्चित दिशा आणि नियोजन ........................... १२४
२७. साऊथ आफ्रिका .......................................... १२७
२८. विजयाच्या शिखरावर ..................................... १३२
२९. हा तुमचा विजय आहे .................................... १३४
३०. प्रेसिडेंट बुश .............................................. १३७
३१. रेव्हरंड जेसी जॅक्सन ...................................... १३९
३२. शब्द आणि कृती ......................................... १४०
३३. पुरस्कार ................................................... १४१
३४. ड्रीम्स फ्रॉम माय फादर .................................... १४२
३५. ओडॅसिटी ऑफ होप ...................................... १४४
३६. महत्त्वाकांक्षा आणि ध्येयपूर्ती .............................. १४९
३७. मॅडेलिन, स्टॅनले आणि ॲन डनहॅम ....................... १५७
३८. मिशेल ओबामा ........................................... १६१
३९. फर्स्ट लेडी ................................................ १६४
४०. व्हाईट हाऊस .............................................. १६८
४१. प्रेसिडेंट ओबामांची भाषणे ................................ १७१
४२. ओबामा यांच्या आयुष्यातील यशाच्या पायऱ्या ........... १९०

✦✦✦